# अहमदनगर महानगरपालिका , अहमदनगर

## मानधनावर कराराबध्द नियुक्ती बाबत

## (Walk In Interview)

अहमदनगर महानगरपालिकेच्या मोटार व्हेईकल विभाग अत्यावश्यक सेवेकरीता मानधनावर करारा नुसार अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्या करीता नियुक्तीसाठी खालील दर्शविलेल्या तात्पुरत्या स्वरुपात पदांवर थेट पध्दतीने उमेदवारांच्या मुलाखती आयोजित करण्यांत येत आहेत.

तरी पात्र उमेदवारांनी शैक्षणिक पात्रता , अनुभव दाखला व तद्नुषंगिक प्रमाणपत्राच्या सांक्षाकित प्रती जोडलेले अर्ज मा. आयुक्त , अहमदनगर महानगरपालिका , अहमदनगर यांचे नावे करुन अर्जासह दिनांक २९ / ०२ / २०१६ रोजी सकाळी १० : ०० वाजता समक्ष आवश्यक त्या सर्व मुळ कागदपत्रासह मा. आयुक्त कार्यालय , अहमदनगर महानगरपालिका , औरंगाबाद रोड येथे थेट पध्दतीने मुलाखतीसाठी उपस्थित रहावे उशिरा आलेल्या उमेदवारांचा विचार केला जाणार नाही व **सदर मानधनावर कराराबध्द नियुक्ती बाबतच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे राहतील.**

| अ. क्र. | तात्पुरत्या स्वरुपात पदनाम | विभाग | पद संख्या | आवश्यक शैक्षणिक पात्रता | दरमहा मानधन |
|---|---|---|---|---|---|
| १ | वेल्डर | मोटार व्हेईकल | १ | कामाचा अनुभव आवश्यक | ७,५००/- |

### मानधनावर कराराबध्द नियुक्तीसाठी अटी व शर्ती

१. सदर पदांवर पात्र उमेदवारांची निवड झाल्यानंतर सदरची नियुक्ती ही पुर्णतः मानधनावर करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात असल्याने नमुद केलेल्या दरमहा मानधना व्यतिरिक्त निवृत्ती वेतन, विमा योजना,भविष्य निर्वाह निधी तसेच कायम सेवेच्या कोणत्याही प्रकारचे लाभ अनुज्ञेय राहणार नाहीत.

२. उमेदवारांची निवड झाल्यानंतर नेमणूक सेवकाने मानधनावर कराराबध्द सेवेसाठी पोलीस प्राधिका-या कडील चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र व मा.जिल्हा शल्य चिकित्सक,अहमदनगर यांचे कडील सक्षम असले बाबतचे प्रमाणपत्र देणे आवश्यक राहील.

३. नियुक्ती झालेल्या उमेदवारांचे काम समाधानकारक न आढळल्यास व त्यांचे सेवाविषयक काही तक्रारी उद्‌भवल्यास पुर्वसूचना न देता दिलेली मानधनावरील कराराबध्द नियुक्ती तात्काळ संपुष्टात येईल.

४. शासन सेवा व शर्ती खाली ही नेमणूक नसल्याने निवड झालेल्या उमेदवारांच्या मानधनावरील कराराबध्द नियुक्तीचा कालावधी समाप्तीनंतर त्यांना कोणतेही अधिकार राहणार नाहीत.

५. निवड झालेल्या उमेदवारांची नियुक्ती ही पुर्णतः मानधन तत्वानुसार करारा प्रमाणे अटी व शर्ती नुसार तात्पुरत्या स्वरुपात असल्याने सदर मानधनावरील नियुक्तीचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर सेवेत कायम नियुक्ती होणे बाबत व कायम सेवेचे कुठल्याही प्रकारचे फायदे मिळणे करिता नियुक्ती उमेदवारास मा. न्यायालयात अथवा उच्च न्यायालयात याबाबत दाद मागता येणार नाही. सदरची मुदत संपल्यानंतर सदरचा मानधनावरील कराराबध्द नेमणूक आदेश हा अपोआप व्यपगत होईल.

६. निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती मानधनावरील कालावधीमध्ये कार्यालयीन परवानगी शिवाय त्यांना कार्यक्षेत्र सोडता येणार नाही.

७. निवड झालेल्या उमेदवारांना सदर कालावधीतील मानधनावरील सेवेचा राजीनामा दयावयाचा असेल तेव्हा मा. आयुक्त, अहमदनगर महानगरपालिका यांचेकडे १५ दिवसाच्या आतं त्यांना या बाबत पुर्व सुचना म्हणून नोटीस दयावी लागेल .

८. नियुक्ती करीता दिलेली माहिती खोटी असल्याचे निष्पन्न झाल्यास उपरोक्त मानधनावरील कराराबध्द नेमणूक तात्काळ रद्द करण्यांत येवून सेवा समाप्त करण्यांत येईल.

९. विवाहीत असल्यास एक पती किंवा एक पत्नी असावे.

१२

१०. महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम ०५ मधील प्रतिज्ञा पत्राचा नमुना अ ( नियम ४) अपत्या बाबतचे प्रतिज्ञापत्र करुन दयावे लागेल.

११. तात्पुरत्या स्वरुपात मानधना वरील करारबध्द नियुक्ती कालावधीमध्ये सेवेत हलगर्जीपणा, निष्काळजीपणा व इतर काही त्रुटी उद्‌भवल्यास त्या बाबतची सर्वस्वी जबाबदारी ही नियुक्त झालेल्या उमेदवारांवर राहील व त्यांचेवर नियमानुसार कारवाई करण्यांत येईल.

१२. मुलाखती बाबतचे सर्व अधिकार व हक्क,पदांच्या फेरबदल व अटी व शर्ती बाबतचा अधिकार आणि जाहिराती नुसार पदे भरणे बाबत कोणताही अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार मा.आयुक्त,अहमदनगर महानगरपालिका यांना राहील.कोणताही किंवा सर्व अर्ज काही कारण न दर्शविता नाकारण्याचा अधिकार राखून ठेवीत आहेत. व याबाबत कोणत्याही उमेदवारास त्या बाबत लेखी कळविण्यात येणार नाही.

१३. मानधनावरील करारबध्द नियुक्ती झालेल्या उमेदवारांनी सदरचा नियुक्ती आदेश मिळताच ७ दिवसाचे आत मोटार व्हेईकल विभागामध्ये रुजु व्हावे लागेल अन्यथा दिलेला नियुक्ती आदेश तात्काळ संपुष्टात आले बाबतचे समजण्यात येईल.

१४. सदर मानधनावर करारबध्द नियुक्त झालेल्या उमेदवारांनी वरील सर्व अटी व शर्ती मान्य असले बाबतचे तसे लेखी करारपत्र रु.१००/- च्या मुद्रांकावर मा.जिल्हा दंडाधिकारी , अहमदनगर अथवा त्यांनी अधिकार प्रदान केलेले अधिकारी यांचे समोर साक्षांकीत करुन देणे बंधनकारक आहे .

**मा.आयुक्त यांचे मान्यतेने.**

उप-आयुक्त
तथा सदस्य सचिव निवड समिती
अहमदनगर महनगरपालिका